अपंग कर्मचारी किंवा मतीमंद मुलांचे पालक या
संवर्गातून विनंती बदली करणेबाबत.
श्री. प्रसाद भिमराव शिंदे, ग्रामपंचायत अधिकारी

जिल्हा परिषद अहिल्यानगर
आदेश सामान्य प्रशासन विभाग-२
साप्रवि-२/ग्राप-१/२६४/२०२६
दि. स्वाक्षरीखाली नमूदप्रमाणे

वाचा :- १. ग्राम विकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्रमांक
जिपब-४१४/प्र.क्र.११२/आस्था-१४ दिनांक १५ मे २०१४
२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती नेवासा यांचेकडील प्रस्ताव
क्र. वशि/आस्था-२/७३/२०२६ दि.१६/०१/२०२६.

महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभागाकडील संदर्भ क्र १ च्या शासन निर्णयामधील प्रकरण-१ मधील ३ (ब) व प्रकरण १ मधील मुद्दा क्र. ४(४) अ.क्र.२ नुसार खालील कर्मचारी हे मतीमंद मुलाचे पालक असलेने मला प्रदान केलेल्या अधिकारान्वये ग्रामपंचायत अधिकारी वर्ग-३ संवर्गातील खालील कर्मचाऱ्यांच्या नावापुढे रकाना क्रमांक ४ मध्ये नमुद केलेल्या ठिकाणी विनंतीने स्थानापन्न नियुक्ती करीत आहे.

| अ.क्र. | ग्रामसेवक यांचे नांव | कार्यरत ठिकाण | बदलीचे ठिकाण | बदलीचा प्रकार |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | श्री. प्रसाद भिमराव शिंदे | पंचायत समिती नेवासा | पंचायत समिती संगमनेर | मतीमंद मुलांचे पालक असल्याने विनंती बदली |

सदरची बदली कर्मचा-याच्या विनंतीने असल्याने त्यांना पदग्रहण अवधी व प्रवासभत्ता अनुज्ञेय राहणार नाही. बदली झालेल्या कर्मचा-यांनी रजेवर न जाता बदलीने पदस्थापना केलेल्या ठिकाणी त्वरीत हजर व्हावे.

सदरचा आदेश जिल्हा परिषद अहिल्यानगरच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. 202607280601 07 असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 28-07-2026 20:06:41
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री. प्रसाद भिमराव शिंदे, पंचायत समिती नेवासा
व्दारा व प्रत गट विकास अधिकारी, पंचायत समिती नेवासा

२/- उपरोक्त नमुद ग्रामपंचायत अधिकारी यांना बदलीचे ठिकाणी हजर होणेकामी स्थानिक व्यवस्था करून तात्काळ आदेशामध्ये नमुद केलेल्या दिनांकास कार्यमुक्त करणेत यावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

प्रत - गट विकास अधिकारी, पंचायत समिती संगमनेर

२/- संबंधित ग्रामपंचायत अधिकारी तालुक्यात रूजु होताच रूजु अहवाल तात्काळ इकडेस सादर करावा. संबंधित ग्रामपंचायत अधिकारी त्यांचे स्वग्राम तसेच यापुर्वी सेवा केलेल्या ग्रामपंचायतीच्या ठिकाणी पदस्थापना देण्यात येऊ नये व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल इकडेस सादर करावा.

स्वाक्षरीत /-
(आनंद भंडारी) भा.प्र.से.
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर